मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र.एमसीएम-२०२४/प्र.क्र.२२६/निवडणूक/कार्या-३३

सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक ७ मार्च, २०२४

प्रति,

(१) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
(२) विभागीय आयुक्त (सर्व)
(३) जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)
(४) उप जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

विषय :- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचना..

संदर्भ :- शासनपत्र सामान्य प्रशासन विभाग क्र.एमसीएम-२०२४/प्र.क्र.२२६/ निवडणूक/कार्या-३३, दिनांक ०५ मार्च, २०२४

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन दि.०५ मार्च, २०२४ च्या पत्राव्दारे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी आपल्या प्रशासकीय विभागाच्या व आपल्या अधिनस्त कार्यालयाच्या अधिकृत वेबसाईटवर (संकेतस्थळावर) कोणत्याही प्रकारच्या राजकीय नेत्यांची छायाचित्रे असल्यास, सदरची छायाचित्रे विनाविलंब काढून टाकण्याची तातडीने कार्यवाही करण्याबाबत देण्यात आलेल्या सूचनेचे पालन हे आगामी काळात होणारी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची आदर्श आचारसंहिता प्रत्यक्षात लागू झाल्याच्या दिवशी करावयाची आहे.

तसेच आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या आचार संहितेच्या काळात व तद्नंतर निवडणूकीची प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत क्षेत्रियस्तरावर उपस्थित होणाऱ्या सर्वसाधारण तक्रारी व दाखल तक्रारीतील समस्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित निवडणूक अधिकारी यांनी भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी (म.रा.) यांच्याव्दारे वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या सूचनांनुसार प्रकरण तपासून आपल्यास्तरावर प्रकरणपरत्वे निर्णय घेणे अपेक्षित असल्याची बाब निदर्शनास आणण्यात येत आहे.

२. सदर शासनपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०३०७१७१४५४२१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

आपला

MANOHAR RAMCHANDRA PARKAR

Digitally signed by MANOHAR RAMCHANDRA PARKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=c4c0810e9c94cf92d42a36d93c8f7b6ac18542c1ee758c9cfddcea906d9cf544,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FB43688343316856C0F7E793462127AA87FCE45724E87929C6889798CD7D2C62, cn=MANOHAR RAMCHANDRA PARKAR
Date: 2024.03.07 17:25:38 +05'30'

(मनोहर पारकर)
उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य